| जिल्हाधिकारीतथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट -www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा १ महसूल - |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४ -सिआर/ | दिनांक १६.०३.२०२० |

**प्रति,**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत नांदेड जिल्हा

**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या अनुषंगाने सर्व आठवडी बाजार बंद ठेवणेबाबत.

**संदर्भः-**१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वयेमा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनीराज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.त्यामध्ये सर्व जिल्हादंडाधिकारी यांना साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ नुसार नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना आवश्यक आहे, त्याकरण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्देशित केले आहे.

त्यानुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नांदेड जिल्हयातील महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत,सर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व आठवडी बाजार, दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश देत आहे.

त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, उपरोक्त सुचना लक्षात घेवून नांदेड जिल्हयातील महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत, सर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील आठवडी बाजार,दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

Scanned by CamScanner

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) पोलीस अधीक्षक, नांदेड यांना कार्यवाहीस्तव

४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड.

५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

७) सर्व नगरपंचायत/नगरपालिका (मार्फत जिल्हा प्रशासन अधिकारी,जि.अ.का.नांदेड.)

८) सर्व सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती,नांदेड जिल्हा ( मार्फत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड)

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner